जिल्हा कृषी महोत्सवाचे डोंबिवलीत उद्घाटन

पिकाच्या योग्य हमीभावासाठी सरकारचे कसोशीने प्रयत्न : रवींद्र चव्हाण

ठाणे, दि. ७ (प्रतिनिधी): ''राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य हमीभाव मिळावा म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील आमचे सरकार प्रयत्न करीत असून 'शेतकरी सन्मान योजने'ची ठाणे जिल्ह्यात उत्तम अंमलबजावणी करण्यात येईल,'' असे राज्यमंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. ते गुरुवारी डोंबिवलीत जिल्हा कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. दि. ११ फेब्रुवारीपर्यंत डोंबिवलीच्या सावळाराम महाराज म्हात्रे स्टेडियम येथे हा महोत्सव सुरू राहणार आहे. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा मंजुषा जाधव, कल्याण-डोंबिवली महापौर विनिता राणे, कृषी सभापती उज्ज्वला गुळवी, महिला बालकल्याण सभापती दर्शना ठाकरे, जिल्हा कृषी अधीक्षक अंकुश माने, आत्माचे प्रकल्प संचालक पी. एम. चांदवडे हे उपस्थित होते.

''शेतकऱ्यांना गट स्थापन करण्यासाठी शासन मदत करीत असते. या माध्यमातून त्यांना त्यांचा विकास करता येणे शक्य आहे,'' असे सांगून रवींद्र चव्हाण यांनी ''शेतकऱ्यांशी संबंधित योजनांचा त्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा,'' असे सांगितले. ''शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध प्रयोग सुरू असून शेतकऱ्यांनी या संशोधनाचा फायदा करून घ्यावा. वांगणीमध्ये फुलणाऱ्या गुलाबाची विदेशात निर्यात होते. त्याप्रमाणे जिल्ह्यातील इतरही शेतकऱ्यांनी फुलशेती व भाजीपाला लागवड मोठ्या प्रमाणावर करावी,'' असे आवाहनही त्यांनी केले. ''बदलापूर परिसरात मोगऱ्याची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. परंतु, शेतकरी बाजारपेठेत वेळेवर पोहोचू शकत नाही,'' असेही ते म्हणाले. मंजुषा जाधव याप्रसंगी म्हणाल्या की, ''डोंबिवलीतील या कृषी महोत्सवालादेखील चांगला प्रतिसाद मिळेल, अशी आशा आहे. वाडा परिसरातील पिकविल्या जाणाऱ्या भाताला आरोग्याच्या दृष्टीनेदेखील महत्त्व असल्याने डॉक्टर्ससुद्धा याची दखल घेतात. तसेच शहापूर भागात होणाऱ्या भेंडीची निर्यात परदेशात होते, ही जिल्ह्याच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांचा सन्मान

येत्या १४ फेब्रुवारीला होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषी पुरस्कार मिळालेल्या कैलास राघो बराड, शहापूर, दिलीप बाबाजीराव देशमुख, वांगणी, लक्ष्मण गंगा पागी, शहापूर, विनायक मारुती पोटे, विजया अरविंद पोटे यांचा रवींद्र चव्हाणांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याशिवाय 'आत्मा' अंतर्गत गट राजमाता शेतकरी स्वयंसाहाय्यता गट, कृषिभूषण शेतकरी स्वयंसाहाय्यता गट, समर्थ सेंद्रिय भाजीपाला उत्पादक गट, सप्तशृंगी शेतकरी गट यांचादेखील सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे कल्याण, शहापूर, मुरबाड मधील ३१ शेतकऱ्यांनादेखील गौरविण्यात येणार आहे.

शेतमालास प्रोत्साहन देण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये 'कॉप शॉप'

ठाणे, दि ७ (प्रतिनिधी): आता 'कॉप शॉप'च्या माध्यमातून शेतातला चांगला, ताजा शेतमाल योग्य किंमतीत खरेदी करता येणार आहे. शेतीमालाच्या थेट विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी सहकार व पणन विभागाने ठाणे जिल्ह्यात १२ 'कॉप शॉप' सुरू केले आहे. कल्याण शहरात तीन, उल्हासनगर दोन, मुलुंड दोन, भिवंडी एक, अंबरनाथ एक आणि ठाणे शहरात तीन सोसायट्यांमध्ये हे 'कॉप शॉप' सुरु झाले आहे. सहकार व पणन विभागाच्या या योजनेला शहरी भागात चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शेतकरी ते ग्राहक उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यात १६ शेतकरी कंपन्या स्थापन करण्यात येत आहे. त्यात सुमारे दोन हजार शेतकरी एकत्र आले आहे. सद्यस्थितीत उस्मानाबाद, नाशिक, सावर्डे, मुरबाड या भागातील शेतकरी कंपन्या ठाणे जिल्ह्यातील सोसायट्यांशी जोडण्यात आल्या आहे. या शेतकऱ्यांचा शेतमाल आठवड्यात ठरवून दिलेल्या दिवशी सोसायट्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. ग्राहकांना रास्त दरात ताजा आणि वैविध्यपूर्ण भाजीपाला, फळभाज्या व फळे उपलब्ध होत आहे. याशिवाय, जिल्ह्यात विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांच्यावतीने कृषिपूरक व्यवसाय सुरू करण्यात आले आहे, ज्याचा फायदा जिल्हयातील शेतकऱ्यांना होत आहे. त्यात सेंद्रिय खते विकी, आर.ओ.वॉटर प्लांट, कॅन्टीन, दूध संकलन, शीतगृहे, शॉपिंग मॉल्सला लागणारे साहित्य असे एकूण २३ व्यवसाय संस्थेने सुरू केले आहे. त्यात सुमारे ३० लक्ष रूपयांची गुंतवणूक संस्थांनी केली असून, त्यांना चांगला नफा होत आहे.

बदलापूरच्या स्टेशनपाडा माघी गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात

बदलापूर, दि. ७ (प्रतिनिधी): बदलापूर स्टेशन पाड्यातील माघी गणराय शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी विराजमान होणार आहेत. हे या गणेशोत्सवाचे ५१ वे वर्ष आहे.

गेल्या ५० वर्षांपासून बदलापूर रेल्वे स्थानकाशेजारी हा गणपती नारळाच्या नवसाला पावतो, अशी ख्याती आहे. उत्सवाच्या दहा दिवसांत ठाणे जिल्ह्यासह विविध ठिकाणचे भाविक श्रींच्या दर्शनासाठी येतात. उत्सवाला जणू जत्रेचे स्वरूप येते. मागील वर्षी रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन मंडळातर्फे करण्यात आले होते. दरवर्षी ऐतिहासिक, पौराणिक देखावे सादर करण्यावर भर दिला जातो. यंदाही नितिन चंद्रकांत देसाई यांच्या कल्पनेतून पुरातन मंदिराचा देखावा सादर केला गेला आहे. मूर्तिकार समीर आंबवणे यांनी साकारलेली आकर्षक मूर्ती ही या देखाव्याचे आकर्षण आहे. यंदाच्या वर्षी राकेश जगे मंडळाचे अध्यक्ष आहेत, तर उपाध्यक्ष योगेश धोत्रे हे उपाध्यक्ष, सरचिटणीस अविनाश खिलारे आहेत.

साहाय्यक आयुक्त अनिल लाड यांना सक्तीची सेवानिवृत्ती

आरोप सिद्ध झाल्याने महासभेचा निर्णय

कल्याण, दि. ७ (प्रतिनिधी) : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या सेवेत असताना राज्य शासनाची वा महानगरपालिकेची परवानगी न घेता दोन खाजगी कंपन्यांचे संचालकपद भूषविणारे साहाय्यक आयुक्त अनिल लाड यांना सक्तीची सेवानिवृत्ती देण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या महासेभेत त्यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला अखेर मंजुरी देण्यात आली. महिला सदस्यांच्या मागणी व महापालिकेच्या प्रशासनाने केलेल्या खातेनिहाय चौकशीत लाड यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्याने महासभेने हा निर्णय घेतला आहे.

लाड हे उच्चविद्याभूषित व कायद्याचे अभ्यासक असलेले साहाय्यक आयुक्त होते. त्यांनी प्रभागक्षेत्र अधिकारी, प्रभारी सचिव, संगणक सिस्टीम मॅनेजर व कर निर्धारक अशा विविध पदांवर काम केले आहे. महापालिका सेवेत असताना त्यांनी राज्य शासनाची वा महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता दोन खाजगी कंपन्यांचे संचालकपद भूषविले होते. सदरची बाब नियमबाह्य असल्याने विधानपरिषदेचे शिवसेनेचे आ. अनिल परब यांनी हा विषय अधिवेशनात लावून धरला होता. त्यावेळी लाड यांना निलंबित करण्याचे निर्देश शासनाच्यावतीने देण्यात आले होते. मात्र, त्यावर पालिका प्रशासनाने कोणतीच कारवाई न केल्याने आ. परब यांनी पुन्हा एकदा अधिवेशनादरम्यान शासनाचे या

विषयाकडे लक्ष वेधले. त्यावेळी विधानपरिषदेच्या सभापतींनी लाड यांना बडतर्फ करण्याचे निर्देश दिले.

दरम्यानच्या काळात पालिका प्रशासनाने शासनाच्या निर्देशानुसार अनिल लाड यांना निलंबित करण्याची कार्यवाही केली. त्यानंतर त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली. या चौकशीत लाड यांच्यावरील आरोप सिद्ध झाले. त्यामुळे त्यांच्यावर शास्ती लादण्याचा अधिकार हा महासभेचा असल्याने पालिका प्रशासनाने त्याबाबतचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी पाठविला होता. या विषयावर चर्चा करताना भाजपचे नगरसेवक राजन सामंत, शिवसेनेच्या माधुरी काळे यांनी लाड यांच्या बडतर्फीचीच मागणी केली.

अन्य अधिकाऱ्यांवरही कारवाई करा

प्रशासनात शिस्त यावी आणि जरब बसावा, यासाठी अशाचप्रकारची कारवाई अन्य अधिकाऱ्यांवरदेखील करावी, अशी मागणी शिवसेनेचे सुधीर बासरे यांनी केली. मनसेचे गटनेते मंदार हळबे यांनी सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी भूमिका घेतली. अखेर सभागृहनेते श्रेयस समेळ यांनी अनिल लाड यांना सक्तीची सेवा निवृत्ती द्यावी, असा प्रस्ताव मांडला आणि तो एकमताने मंजूर करण्यात आला.

नौपाड्यातील वर्षा सोसायटीचा कारभार पारदर्शी

उपनिबंधकाच्या चौकशीत निर्वाळा

ठाणे, दि. ७ (प्रतिनिधी): नौपाडा ठाणे येथील वर्षा सोसायटी या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासद विनय फाटक, प्रसाद ताम्हनकर, उमेश जोशी, योगेश करंदीकर व नितीन ठाकूर यांच्यासह इतर काही सभासदांनी उपनिबंधकांकडे इमारतींच्या दुरुस्ती प्रक्रियेत सोसायटीच्या व्यवस्थापन समितीने आर्थिक गैरव्यवहार केल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. तसेच त्यांच्या चौकशीचीही मागणी करण्यात आली होती. या कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या संदर्भात वर्तमानपत्रांत बातमीसुद्धा वरील सभासदांच्या पुढाकाराने दिली होती. ठाण्याचे सहकारी संस्थेच्या उपनिबंधकांनी विधिज्ञ विलास गांगण यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. चौकशी अधिकारी गांगण यांनी उपलब्ध सर्व कागदपत्र व लिखित पुरावे याआधारे चौकशी करून तक्रारदारांच्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे वास्तव समोर आणले.

सोसायटीच्या व्यवस्थापन समितीने वेळोवेळी वार्षिक/विशेष सर्वसाधारण सभा घेऊन सर्व सभासदांना दुरुस्तीविषयी व त्यासंबंधी लागणाऱ्या निधीसंबंधी माहिती दिल्याचे तसेच इमारत दुरुस्तीतज्ज्ञांच्या देखरेखीखाली आणि उपविधी व अन्य नियमातील तरतुदीप्रमाणे केल्याचे चौकशी अधिकारी गांगण यांनी नमूद केले आहे. इमारत दुरुस्तीची सर्व बिले ही चेकने अदा केल्याने सदर व्यवहारात संस्थेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही आणि कोणताही गैरव्यवहार झालेला नाही, असेही त्यांनी सांगितले. तसेच सदर तक्रारीत तथ्य न आढळल्यामुळे चौकशीचा सर्व खर्च तक्रारदारांकडून वसूल करावा, अशी शिफारस गांगण यांनी केली आहे. बहुसंख्य सभासदांच्या एकीमुळे आणि त्यांनीच निवडून दिलेल्या सोसायटीच्या व्यवस्थापन समितीला असलेल्या त्यांच्या ठाम पाठिंब्यामुळे या मोजक्या सदस्यांचे मनसुबे फलश्रुत होताना दिसत नाहीत, तसेच आपल्याच सोसायटीची बदनामी करणे हे लांच्छनास्पद आहे, असे मत सभासदांनी व्यक्त केले.

हायब्रीड प्रकल्पातील जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला देण्याची मागणी

शहापूर, दि. ७ (प्रतिनिधी): शहापूर तालुक्यात शहापूर ते चोंढे व शहापूर ते किन्हवली या रस्त्यावर हायब्रीड अॅन्यु प्रकल्पामधून रस्ता रूंदीकरण होत आहे. शहापूर तालुक्यातील या प्रकल्पाबाबत रस्त्यानजीक जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस किंवा माहिती देण्यात आलेली नाही. या प्रकल्पांतर्गत होणाऱ्या रस्ता रूंदीकरणामध्ये ३० गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत. शहापूर ते चोंढे रस्त्यावर असणाऱ्या वेहलोली बु. गावातील शेतकऱ्यांनी यासाठी विरोध केला आहे. वेहलोली बु. गावातील शेतकरी व प्रकल्पग्रस्त संघटनेने जमिनी जाणाऱ्या शेतकऱ्यांना काम करताना विश्वासात घेऊन त्यांना कामाची माहिती देण्याची गरज असून जमिनींचा मोबदला देण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. रस्त्याची मोजणी व काम सुरू करण्यापूर्वी शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नसून शेतकऱ्यांच्या रस्त्यानजीक जाणाऱ्या जमिनींचा मोबदला देण्याची तरतूद केलेली नसल्याने तालुक्यातील शेतकरी व वेहलोली बु. गावातील ग्रामस्थ नाराज आहेत. त्यातच पूर्वी शेतकऱ्यांनी या रस्त्यासाठी जमिनी दिल्या, तेव्हा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग नव्हता, असे शेतकरी व प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष योगेश हजारे यांनी म्हटले. दरम्यान, योग्य ती कार्यवाही करण्यात न आल्यास आंदोलनाचाही इशारा त्यांनी दिला आहे.

डोंबिवलीत गुलाब महोत्सवाचे आयोजन

डोंबिवली : डोंबिवलीकर रोज सोसायटी आयोजित राज्यस्तरीय गुलाब प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध प्रजातींच्या गुलाबांचे प्रदर्शन पूर्वेतील बालभवन येथे आयोजित करण्यात आले आहे. यात गुलाबांची नाजूकता त्यांचे मनमोहक रूप, आकर्षक रंग, डौल अनुभवण्याची संधी यानिमित्ताने डोंबिवलीकरांना मिळणार आहे. तीन दिवसीय प्रदर्शन डोंबिवलीकर मासिकाचे संपादक व राज्यमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून साकारले आहे. या प्रदर्शनात सुमारे ५०० ते ६०० प्रजातीचे सुमारे तीन हजारांहून अधिक गुलाब रसिकासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पुणे, ठाणे, रायगड जिल्ह्यातील गुलाब उत्पादक यात सहभागी होणार आहेत.

बिगर आदिवासी प्रश्नाबाबत ११ फेब्रुवारीला सुनावणी

शहापूर, दि. ७ (प्रतिनिधी) : नुकतीच बिगर आदिवासी प्रश्नांबाबत उच्च न्यायालयात सुनावणी करण्यात आली. मात्र, शासनाने पुन्हा वेळ मागितल्याने पुढील सुनावणी दि. ११ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार आहे. दरम्यान, याच दिवशी जनजाती सल्लागार समितीची बैठकही आयोजित करण्यात आली आहे.

याबाबत बिगर आदिवासी हक्क बचाव समितीचे काशिनाथ तीवरे यांनी सांगितले की,'' न्यायालयात सुनावणीदरम्यान पुन्हा शासनाने वेळ मागितल्याने पुढील सुनावणी दि. ११ फेब्रुवारी रोजी होणार आहे. दरम्यान, सुनावणीनंतर समितीच्यावतीने आदिवासी विकासमंत्री विष्णू सवरा यांची भेट घेऊन त्यांना बिगर आदिवासींचा गंभीर प्रश्नाबाबत माहिती देण्यात आली. तसेच याबाबत एक निवेदनही देण्यात आले.

समतीने यावेळी जनजाती सल्लागार समितीची बैठक घेऊन बिगर आदिवासींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळावे, अशी विनंती सवरा यांच्याकडे केली. त्यानुसार जनजाती सल्लागार समितीची बैठकही दि. ११ फेब्रुवारी रोजी शासनाने आयोजित केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकासमंत्री व सर्व आदिवासी आमदार सकारात्मक भूमिका घेऊन न्याय देतील, अशी अपेक्षा बिगर आदिवासी हक्क बचाव समितीने व्यक्त केली आहे.

विद्यार्थ्यांना वह्या व गणवेश वाटप

पेण : प्राथमिक शाळा बळावली येथे गोरक्षक मंगळ पाटील सामाजिक गोपाळन संस्था पेण, रायगड यांच्या संस्थेच्यामार्फत पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या, फळे तसेच गणवेश वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मंगळ पाटील हे गोमातेचे सेवक म्हणून रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असून गोमातेचे रक्षण करून त्यांनी कापण्यासाठी घेऊन जाणाऱ्या जनावरांना सेवा संस्थेत आणून देखभाल करीत आहेत. त्यांनी आज गरीब गरजू विद्यार्थ्यांना वही, खाऊ, कपडे देऊन वाटप केल्यामुळे शिक्षकांनी शाल श्रीफळ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

निवेदन

मुंबई तरुण भारतमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकूरानुसार प्रसिद्ध होत असतात. जाहिरातदारांबरोबर अथवा व्यक्तींबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान वा हानी झाल्यास त्याबाबत मुंबई तरुण भारत जबाबदार राहणार नाही. आमच्या वाचकांना नम्र विनंती की, त्यांनी जाहिरातदारांबरोबर कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घ्यावी.

वसई विरार शहर महानगरपालिका
विद्युत विभाग, प्रभाग समिती 'बी'
निविदा सूचना क्र. २ (२०१८-२०१९)

वसई विरार शहर महानगरपालिकेतील **१४** विद्युतीय कामांकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांच्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुज्ञाप्राप्त विद्युत ठेकेदाराकडुन ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा सुचना व निविदा प्रपत्र http://mahaetenders.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर **दि.०८/०२/२०१९** रोजी दुपारी ३.०० वाजेपासुन ते **दि.२०/०२/२०१९** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. ऑनलाईन ई-निविदा http://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर **दि.०८/०२/२०१९** रोजी दुपारी ३.०० वाजेपासुन ते **दि.२०/०२/२०१९** रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास **दि.२२/०२/२०१९** रोजी दु.३.०१ मि. नंतर अथवा इतर सोईच्या दिवशी ऑनलाईन उघडण्यात येतील.

जा.क्र. : वविशम/नासो/विवि/२९७/२०१९
दि : ०७/०२/२०१९

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती बी
वसई विरार शहर महानगरपालिका

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भुलेश्वर शाखा
३७/४१, बर्फीवाला इमारत, व्ही. पी. रोड, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : ०२२-२३८२०९८१, २३८२६२८१, २३८२४३१८, फॅक्स क्र. २३८२०९७३
ईमेल : cbsbhuleshwar@unionbankofindia.com

ई-लिलाव विक्री सूचना
(स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचावयाच्या सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसाधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदार/कर्जदारांना आणि जामिनदार/जामिनदारांना सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनको यांच्याकडे गहाणवट/प्रभारीत खालील नमूद स्थावर मालमत्तेचा, **युनियन बँक ऑफ इंडिया**, प्रतिभूत धनको, चे प्राधिकृत अधिकारी यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष (जे लागू असेल ते) ताबा घेतलेला असून, **श्री. संदीप किसन दंडवते आणि सौ. शुभांगी संदीप दंडवते (कर्जदार) आणि श्री. विजय राजाराम तगडकर (जामीनदार) यांची युनियन बँक ऑफ इंडिया, प्रतिभूत धनको** यांना **दि. ३१.०१.२०१९ रोजी नुसार** देय असलेली रक्कम **रु. ६३,४२,०३०/- (रु. त्रेसष्ठ लाख बेचाळीस हजार तीस मात्र)** अधिक दि. ०१.०२.२०१९ पासूनचे व्याज, शुल्क आणि त्यावरील प्रासंगिक प्रभार यांच्या वसुलीकरिता **दि. ०५.०३.२०१९** रोजी **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", आणि "तेथे जे आहे"** तत्त्वावर त्या मालमत्तेची विक्री करण्यात येणार आहे. राखीव किंमत **रु. १७,८१,६९५/-** आणि इसारा रक्कम अनामत **रु. १,७८,१७०/-**.

(माहीत बोजांसह, जर असल्यास, मालमत्तेचा तपशील)

श्री. संदीप किसन दंडवते आणि सौ. शुभांगी संदीप दंडवते (कर्जदार) यांच्या नावे असलेली गाव कुन्झे, तालुका विक्रमगड, जिल्हा पालघर - ४०१ ६०५ येथे स्थित मोजमाप ६६२० चौ.फू. (सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ) असलेली घर क्र. ८०५, नानई इमारत, गाव कुन्झे, तालुका विक्रमगड, जिल्हा पालघर - ४०१ ६०५ ही स्थावर मालमत्ता आणि त्याच्या सीमा पुढीलप्रमाणे : उत्तरेस : श्री. रविंद्र ठाकरे यांचे घर, दक्षिणेस : सौ. गीता शेलार यांचा प्लॉट, पूर्वेस : कुन्झे दुरीपद मार्ग, पश्चिमेस : रस्ता

प्रतिभूत धनकोस ज्ञात असलेले बोजे : काही नाही.

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता प्रतिभूत धनकोंची वेबसाईट म्हणजेच www.unionbankofindia.co.in मध्ये देण्यात आलेली लिंक पहा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अन्वये वैधानिक ३०/१५ दिवसांची विक्री सूचना

या सूचनेस सदर कर्जाच्या कर्जदार/कर्जदारांना आणि जामीनदार/जामीनदारांना उपरोल्लेखित दिनांकास ई-लिलाव विक्री भरविण्यात येणार असल्याबाबत सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अन्वये सूचना असेही समजावे.

सही/-
ठिकाण : मुंबई — प्राधिकृत अधिकारी
दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०१९ — युनियन बँक ऑफ इंडिया, भुलेश्वर शाखा

जनता सहकारी बँक लि., पुणे. (मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कचेरी : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रोड, भारत भवन, पुणे - ४११००२. **फोन :** ०२०-२४४५३२५८, २४४५२८९४
मुंबई वसुली विभाग : एस.के. बोले मार्ग, आगर बाजार, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८ **मोबाईल :** ८६००११०७३६
ईमेल : mumbai.recovery@janatabankpune.com
वेबसाईट : www.janatabankpune.com

ताबा नोटीस

(स्थावर मिळकतीसाठी)
(सिक्युरिटी एन्फोर्समेंट रुल्स २००२ नुसार)

ज्या अर्थी,

मी, सहा. महाव्यवस्थापक जनता सहकारी बँक लि., पुणे बँकेचा अधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तींचा वापर करुन कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स २००२ चे नियम ९ नुसार दिनांक १२/०४/२०१८ रोजी **कर्जदार/मॉर्गेजॉर १) मे. राज पॉली प्रॉडक्ट लि. चे संचालक i) श्री. राजेंद्र हिम्मतलाल सलोट उर्फ श्री. राजेंद्र बटुकलाल सलोट, ii) श्रीमती. हेमा राजेंद्र सलोट आणि iii) श्री. हिम्मतलाल उर्फ बटुकलाल त्रिभुवनदास सलोट उर्फ शाह आणि मॉर्गेजर/ जामिनदार i) श्री. राजेंद्र हिम्मतलाल सलोट उर्फ श्री. राजेंद्र बटुकलाल सलोट आणि जामिनदार i) श्री. राजेंद्र हिम्मतलाल सलोट उर्फ श्री. राजेंद्र बटुकलाल सलोट, ii) श्रीमती. हेमा राजेंद्र सलोट आणि iii) श्री. हिम्मतलाल उर्फ बटुकलाल त्रिभुवनदास सलोट उर्फ शाह यांना नोटीस नुसार दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंतची व्याजासह येणेबाकी रक्कम रू. १५,३७,२१,४९०.५० (रु. पंधरा कोटी सदोतीस लाख एकवीस हजार चारशे नव्वद आणि पैसे पन्नास मात्र)** अधिक पुढील व्याज व खर्च इ. सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसांचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार/मॉर्गेजर, मॉर्गेजर/जामिनदार व जामीनदार यांनी नोटीस मध्ये मागणी केलेली रक्कम दिलेल्या मुदती मध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार/मॉर्गेजर, मॉर्गेजर/जामिनदार व जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते की, मा. चीफ मेट्रोपोलिटन मॅजिस्ट्रेट, मुंबई यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी म्हणजेच मा. कोर्ट कमिशनर श्री. के. ओमान यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ चे कलम १४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन, खाली नमूद केलेल्या **तारण स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक ०६/०२/२०१९ रोजी घेतला आहे व सदर प्रत्यक्ष ताबा अधिकृत अधिकारी, जनता सहकारी बँक लि., पुणे यांना त्याच दिवशी म्हणजे दिनांक ०६/०२/२०१९ रोजी सूपूर्त केला आहे.**

कर्जदार/मॉर्गेजर, मॉर्गेजर/जामिनदार आणि जामीनदार किंवा त्यांचे मार्फत दावा करणारी कोणीही व्यक्ती व तमाम जनतेला या नोटीशीद्वारे ताकीद देण्यात येते की खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करु नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा जनता सहकारी बँक लि., पुणे यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

परिशिष्ट - १
तारण स्थावर मालमत्तेचा तपशील
(श्री. राजेंद्र हिम्मतलाल सलोट यांचे मालकीची स्थावर मिळकत)

सदरहू मिळकत जुना सर्व्हे क्र. ५४(पार्ट), सी टी एस क्र. ४५४, शीट क्र. ७६ एकूण क्षेत्रफळ २९२.९ स्क्वे. मी, पन्नालाल घोष मार्ग, मालाड (प), तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई ४०० ०६४ ही स्थावर मिळकत.

परिशिष्ट - २
तारण स्थावर मालमत्तेचा तपशील
(श्री. राजेंद्र हिम्मतलाल सलोट यांचे मालकीची स्थावर मिळकत)

सदरहू मिळकत सी टी एस क्र. ४५५, ४५५/१ ते १७ क्षेत्रफळ ४८३.८ स्क्वे.मी. पन्नालाल घोष मार्ग, मालाड (प), तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई ४०० ०६४ ही स्थावर मिळकत.

शिक्का

सही/-
(र. प्र. बुवा)
सहा. महाव्यवस्थापक/ अधिकृत अधिकारी
जनता सहकारी बँक लि., पुणे.
दिनांक : ०६/०२/२०१९

PUBLIC NOTICE

Under instructions of my client Smt. SUNANDA DINANATH PRADHAN (age 81) w/o late DINANATH KRISHNANATH PRADHAN aged 70 when passed away residing at 62/A, Pradhan Niwas, parel village, B.P Road, parel, mumbai 12.... Hereby as legal successor of above mentioned residential property categorically assed B property of house no 62/A Pradhan house Parel Village. properly decode FS265362A Parel Village house zone'011admesuring sqft abt. 81.1sq mtr Hereby take all to notice that this particular heirship of late pqr are about to record their present heirs on record's. henceforth for the subject matter of particular property and unrecorded heirs of late pqr are invited to raise their claims of legal heirship for the same and if 15 days from publication of this particular Notice dated 08.02.2019.

if any claims does not arise my client smt SUNANDA DINANATH PRADHAN is free to do the procedure of recording heirs who are present legally to the property.

Sd/-
Adv Satish Jadhav
A/1204 Sainath haights
Mulund East 4000081

इन्नोवासिन्थ इन्व्हेस्टमेन्टस लिमिटेड

नोंद. कार्यालयः सदनिका क्र. सी-२/३, केएमसी क्र. ९१, इन्नोवासिन्थ कॉलनी, खोपोली - ४१०२०३, महाराष्ट्र, भारत
CIN: L67120MH2008PLC178923 **दूरध्वनी :** ०२१९२-२६०२२४
वेबसाईट : www.innovassynthinvestments.in **फॅक्सः** +९१-२१९२-२६३६२८.
ईमेलः secretarial@innovassynthinvestments.in

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, इतर कामांसोबतच दि. ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवार, दि. १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे. मंडळाच्या बैठकीची सूचना www.innovassynthinvestments.in येथे देखील उपलब्ध आहे.

इन्नोवासिन्थ इन्व्हेस्टमेन्टस लिमिटेड करिता
सही/-
ठिकाण : खोपोली — **अभिषेक देशपांडे**
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१९ — **कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

MANDHANA
a whirlpool of ideas!

मंधाना इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन : एल१७१२०एमएच१९८४पीएलसी०३३५५३
नोंदणीकृत कार्यालयः प्लॉट नं. सी-३, एम.आय.डी.सी., तारापुर इंडस्ट्रियल एरिया, बोईसर, जिल्हा - पालघर - ४०१५०६
कॉर्पोरेट कार्यालयः २०५-२१४, पेनिनसुला सेंटर, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई - ४०००१२
फोन नं. ०२२ ४३५३९१९१ • फॅक्स : ०२२ ४३५३९३५८
ई-मेलः cs@mandhana.com • **वेबसाईटः** www.mandhana.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स् अँड डिस्क्लोजर रिक्वायर्मेंट्स्) रेग्युलेशन्स्, २०१५ मधील विनियम ४७ आणि २९ मधील तरतुदींच्या अनुपालनाच्या अनुषंगाने याद्वारे सूचना देण्यात येते की, अन्य बाबींबरोबरच, ३१ डिसेंबर, २०१८ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाही अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षांवर विचार करण्यासाठी आणि त्यांना मान्यता देण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाची सभा गुरुवार दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदरची माहिती कंपनीच्या www.mandhana.com संकेतस्थळावर अणि स्टॉक एक्सचेंजिसच्या www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवरही उपलब्ध आहे.

मंधाना इंडस्ट्रीज लिमिटेड करीता
सही /-
पियुष विराडिया
मुंबई — **गैर कार्यकारी अध्यक्ष**
०७ फेब्रुवारी, २०१९ — **डिआयएन : ०८२३४८६३**